


# साप्ताहिक किंमत सनियंत्रण अहवाल

## ०९.०६.२०२५

**प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषी**

मा. बाळासाहेब ठाकरे कृषीव्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)


The World Bank assisted project: State of Maharashtra Agribusiness & Rural Transformation (SMART)


१. **मका** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)


# मका साप्ताहिक किंमती

## दि. ०८ जून २०२५ अखेर : ₹ २१०० / क्विंटल







- मागील आठवड्यात नांदगाव बाजारात मक्याची किंमत रु. २१०० प्रती क्विंटल होती.
- मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये वाढ झाली आहे.
- खरीप हंगाम २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत रु. २४०० प्रती क्विंटल जाहीर करण्यात आली आहे.
- सध्या मक्याच्या किंमती MSP (२०२४-२५) पेक्षा कमी आहेत.
- मागील आठवड्याच्या तुलनेत मक्याच्या आवक मध्ये राष्ट्रीय पातळीवर २५.७५ % इतकी घट झाली आहे व राज्य पातळीवर २६.६० % इतकी वाढ झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमळनेर बाजारात मक्याची सरासरी किंमत सर्वाधिक रु. २१२६ / क्विंटल होती, तर जालना बाजारात सर्वात कमी किंमत रु. १९४० / क्विंटल होती.


**Source : Agmarknet**


२. **हरभरा** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)

# हरभऱ्याच्या साप्ताहिक किंमती

## दि. ८ जुन २०२५ अखेर: रु. ५४५८/क्विंटल




मागील आठवड्यात लातूर बाजारात हरभऱ्याची सरासरी किंमत रु. ५४५८ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत हरभऱ्याच्या किंमती ५% वाढ झाल्याचे दिसून येत आहे.


रबी हंगाम २०२४-२५ साठी हरभऱ्याची किमान आधारभूत किंमत रु. ५६५० प्रति क्विं. आहे


मागील आठवड्याच्या तुलतेन राष्ट्रीय पातळीवर हरभऱ्याच्या आवकेमध्ये २६ % घट झालेली दिसून येत आहे.


मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी लातूर बाजारात हरभऱ्याच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ५४५८ /क्विंटल.) तर खामगाव बाजारात सरासरी किंमती कमी होत्या. (रु.५०१२/क्विंटल).

## ३. तूर (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)

# तुरीच्या साप्ताहिक किंमती
## दि. ०८ जून २०२५ अखेर: रु. ६४६३/क्विंटल




मागील आठवड्यात लातूर बाजारात तुरीच्या सरासरी किंमती रु. ६४६३ प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीत २.२ % नी घट झाल्याचे दिसून येत आहे.

सध्याच्या किंमती किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत. तुरीचा खरीप हंगाम २०२४-२५ साठी किंमान आधारभूत किंमत रु. ७५५० प्रति क्विं. आहे. तसेच खरीप हंगाम २०२५-२६ साठी रु.८००० प्रती क्विटल जाहीर करण्यात आलेली आहे.

मागील आठवड्याच्या तुलतेन राष्ट्रीय पातळीवर तुरीच्या आवकेमध्ये १६ % घट झालेली दिसून येत आहे.


मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमरावती बाजारात तुरीच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ६५२३ /क्विंटल.) तर खामगाव बाजारात सरासरी किंमती कमी होत्या (रु. ५६९४/क्विंटल).


## ४. **सोयाबीन** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)


**सोयाबीन साप्ताहिक किंमती**

**दि. ०८ जून २०२५ अखेर : रु. ४१९० प्रती क्विंटल**






Source: Agmarknet

- मागील आठवड्यात लातूर बाजारात सोयाबीनची सरासरी किंमत रु. ४१९० प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीत १ % घट झाली आहे.

- सोयाबीनची खरीप हंगाम २०२४-२५ साठी किमान आधारभूत किंमत रु.४८९२ प्रती क्विटल आहे. खरीप हंगाम २०२५-२६ साठी रु.५३२८ प्रती क्विंटल जाहीर करण्यात आलेली आहे. सध्या लातूर बाजारात सोयाबीनच्या किंमती या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत.

मागील आठवड्याच्या तुलनेत सोयाबींनच्या आवकमध्ये राष्ट्रीय पातळीवर १५ टक्क्यांनी घट झाली आहे.


मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी वाशीम बाजारात सोयाबीनच्या सरासरी किंमती सर्वाधिक होत्या (रु. ४३२० /क्विंटल.) तर इंदोर (म. प्र.) बाजारात सरासरी किंमती कमी होत्या (रु. ४०१८/क्विंटल).


## ५. कापूस (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सॲप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtI)

### कापसाच्या साप्ताहिक किंमती


### दि. ०८ जून २०२५ अखेर : रु. ७,५२५/- क्विंटल






- कापसाच्या राजकोट बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. ७५२५ प्रती क्विंटल होत्या.
- या आठवड्यातील कापसाच्या किंमतीमध्ये मागील आठवड्याच्या तुलनेत २.०८ टक्के वाढ झाली आहे.
- सध्या कापसाच्या किंमती MSP (२०२४-२५) पेक्षा जास्त आहेत.
- खरीप हंगाम २०२५-२६ साठी किमान आधारभूत किंमत रु. ७७१० (मध्यम धागा) प्रती क्विंटल जाहीर करण्यात आली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत कापसाच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे १९.७५ % व ३६.४२ % इतकी घट झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी अमरावती बाजारात कापसाच्या सरासरी किंमत सर्वाधिक रु. ७८०० / क्विंटल होती, तर सावनेर (नागपूर) बाजारात सर्वात कमी किंमत रु. ७४०० / क्विंटल होती.





Source - Agmarknet


## ६. कांदा (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)


# कांद्याच्या साप्ताहिक किमती

दि. ०८जुन २०२५ अखेर: रु. १४२४/-क्विंटल






-कांद्याची लासलगाव बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु. १४२४ प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतींत ५ टक्केनी वाढ झाली आहे.

-देशपातळीवर कांद्याच्या आवकमध्ये मागील आठवड्याच्या तुलनेत १९% नी घट झाली आहे.

-मागील आठवड्यात पिंपळगाव बाजारात कांद्याच्या किंमती ( रु. १५२१/क्वि.) सर्वाधिक होत्या, तर सोलापुर बाजारात कांद्याच्या किंमती रु. ९६०/क्वि. इतक्या होत्या.


Source: Agmarkent


७. **टोमॅटो** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtl)


# टोमॅटो साप्ताहिक किंमती

दि. ०८जून २०२५ अखेर : रु. १७२०/क्विंटल






- टोमॅटोच्या पुणे बाजारातील मागील सप्ताहातील सरासरी किंमती रु.१७२० प्रती क्विंटल होत्या. मागील आठवड्याच्या तुलनेत किंमतीमध्ये ८ टक्केनी घट झाली आहे.

- देशपातळीवर मागील आठवड्याच्या तुलनेत टोमॅटोच्या आवक मध्ये २० टक्केनी घट झाली आहे.

- प्रमुख APMC बाजारापैकी मुंबई बाजारात सर्वाधिक किंमती ( रु.१७६०/क्वि.) होत्या तर सोलापूर बाजारात सर्वात कमी किंमती ( रु.९६०/ क्वि.) होत्या.


Source: Agmarknet


८. **हळद** (पुढील लिंकवरून स्मार्ट प्रकल्पाचा व्हॉट्सऍप ग्रूप जॉइन करा → https://shorturl.at/yVdtI)


## हळदीच्या साप्ताहिक किंमती

## दि. ०८ जून २०२५ अखेर : ₹ . १२,०९४ / क्विंटल






- मागील आठवड्यात हिंगोली बाजारात हळदीची किंमत रु. १२०९४ प्रती क्विंटल होती. मागील आठवड्याच्या तुलनेत या आठवड्यात किंमतीमध्ये वाढ झाली आहे.
- मागील आठवड्याच्या तुलनेत हळदीच्या आवक मध्ये राष्ट्रीय व राज्य पातळीवर अनुक्रमे १७.५७ % व ८.४७ % इतकी वाढ झाली आहे.
- मागील आठवड्यात प्रमुख बाजारांपैकी सांगली बाजारात हळदीची सरासरी किंमत सर्वाधिक रु. १३३२५ / क्विंटल होती, तर वाशिम बाजारात सर्वात कमी किंमत रु. ११४४५ / क्विंटल होती.
- २०२४ ते २०३१ या अंदाज कालावधीत जागतिक हळदीची बाजारपेठ लक्षणीय दराने वाढण्याची अपेक्षा आहे.
- सन २०२३-२४ मध्ये हळदीचे लागवडीखालील क्षेत्र आणि उत्पादन यामध्ये महाराष्ट्र राज्य भारतामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे.
- महाराष्ट्रात सांगली, हिंगोली, नांदेड, परभणी, वाशीम हे हळदीची लागवड करणारे प्रमुख जिल्हे आहेत.

(स्रोत - हळद आउटलुक - अहवाल)

**Source - Agmarknet**

(माहिती स्रोत: AGMARKNET व कृषी मंत्रालय, भारत सरकार)

**हा QR कोड स्कॅन करून**

**व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा**

**लिंक - https://shorturl.at/yVdtI**

---

अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष**

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग,

सिम्बायोसिस कॉलेज समोर, गोखले नगर, पुणे- ४११०१६

**फोन** : **020-25656577**, **टोल फ्री क्रमांक**: **1800-210-1770**

**ई-मेल** : market.intelligence.smart@gmail.com

**वेबसाईट** : smart-mh.org